ज्ञानगंगा घरोघरी


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

**Tel. :** (0253) – 2230025, 2230111, 2230227

**Web Site-** http://ycmou.digitaluniversity.ac, & http://ycmou.ac.in

**e-mail** purchase@ycmou.ac.in


# निविदा संच

# विद्यापीठाची वाहने विक्री करणे

## Tender Notice No. PUR/2024-25/114

**Dated :** 26.3.2025

**कुलसचिव**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**Tel. :** (0253) – 2230025, 2230111, 2230227

**Web Site-**www.ycmou.ac.in & http://ycmou.digitaluniversity.ac]

## Tender Notice No. PUR/2024-25/114

# निविदा अनुक्रमणिका



| **क्रमांक** | **तपशील** | **पान क्र. (पासून)** | **पान क्र. (पर्यंत)** |
|---|---|---|---|
| 01 | निविदा वेळापत्रक | 03 | 03 |
| 02 | विक्री करण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशील | 04 | 04 |
| 03 | विक्री करण्यात येणाऱ्या वाहनांचे विक्री मूल्य आणि व्यावसायिक निविदा | 05 | 05 |
| 04 | विक्री करावयाच्या वाहनांसंबंधी अटी व शर्ती | 06 | 08 |
| 05 | व्यापारी निविदा | 09 | 09 |

ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**Tel. : (0253) – 2230025, 2230111, 2230227**

**Web Site-**www.ycmou.ac.in , & http://ycmou.digitaluniversity.ac]

## Tender Notice No. PUR/2024-25/114

## निविदा वेळापत्रक

| | |
|---|---|
| **निविदेचे नाव** | **विद्यापीठाची वाहने विक्री करणे** |
| **निविदेची किंमत** | रु. 500/- (पाचशे फक्त) नापरतावा - विद्यापीठाच्या https://ycmou.unisuite.in/t/328 या लिंकद्वारे पैसे जमा करावेत व Payment Receipt निविदेसोबत जोडावी. |
| **निविदा इसारा रक्कम** | रु. 10,000/- (दहा हजार मात्र) विद्यापीठाच्या https://ycmou.unisuite.in/t/329 या लिंकद्वारे पैसे जमा करावेत व Payment Receipt निविदेसोबत जोडावी. |
| **निविदा जमा करणेचा कालावधी** | दि. 26.03.2025 ते दि. 23.04.2025 सकाळी 10.30 ते सायंकाळी 5.00 पर्यंत मा. कुलसचिव, यचममुवि नाशिक यांचे कार्यालयातील निविदा पेटीत टाकाव्यात. |
| **तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक** | दि. 24.04.2025 रोजी दुपारी 12.00 वाजता |
| **वाहने पाहण्याचा दिनांक** | दि. 26.03.2024 ते दि. 23.04.2025 सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 पर्यंत (कार्यालयीन वेळेत) विद्यापीठ मुख्यालय, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक |

**कुलसचिव**

# विक्री करण्यात येणाऱ्या वाहनांचा तपशील-

| क्र. | वाहन क्रमांक | वाहनांचा प्रकार | वाहनाची सद्यस्थिती चालू/बंद | वाहन खरेदी दिनांक | विभाग | एकूण वाहन वापर कि.मी. | एकूण वर्ष | इंधन प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MH-15 CM 2904 | SPARK | चालू | 8.01.2010 | जनरल | 101410 | 14 वर्ष | पेट्रोल |
| 02 | MH-15 AK-1344 | BOLERO | चालू | 31.3.2012 | जनरल | 158439 | 12 वर्ष | डीझेल |
| 03 | MH-15 AA-5252 | INNOVA | चालू | 09.11.2011 | मा.प्र.कुलगुरु | 202096 | 13 वर्ष | डीझेल |
| 04 | MH-15 AK-1345 | BOLERO | चालू | 31.3.2012 | जनरल | 193231 | 12 वर्ष | डीझेल |

## विक्री करण्यात येणाऱ्या वाहनांचे किमान मूल्य (हातची किंमत) तपशील-

**वाहन जेथे आहे, जसे आहे या तत्वावर विक्रीसाठी उपलब्ध**

| क्र. | वाहन क्रमांक | वाहनांचा प्रकार | वाहन खरेदी दिनांक | विद्यापीठाने निर्धारित केलेले वाहनाचे किमान मूल्य (रु.) |
|---|---|---|---|---|
| 01 | MH-15 CM 2904 | SPARK | 8.01.2010 | Rs. 1,10,000/- (Rupees One Lakh Ten Thousand) |
| 02 | MH-15 AK-1344 | BOLERO | 31.3.2012 | Rs. 3,00,000/- (Rupees Three Lakh) |
| 03 | MH-15 AA-5252 | INNOVA | 09.11.2011 | Rs. 5,20,000/- (Rupees Five Lakh Twenty Thousand) |
| 04 | MH-15 AK-1345 | BOLERO | 31.3.2012 | Rs. 3,00,000/- (Rupees Three Lakh) |

## व्यावसायिक निविदा-

१. वर दिलेल्या तक्त्यामध्ये जुन्या वाहनांचे विद्यापीठाने निर्धारित केलेले किमान मूल्य (विक्री दर) दिलेले आहेत. निविदाधारकांने सदर विक्री दर गृहीत धरून त्यापेक्षा अधिकचे दर व्यावसायिक निविदेच्या तक्त्यामध्ये भरून स्वाक्षरीसह स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात व्यावसायिक निविदा असे नमूद करुन सादर करावेत.

२. प्राप्त झालेल्या दरांपैकी सर्वात जास्त दर असणाऱ्या निविदाधारकास सदर वाहनाची विक्री करण्यात येईल.

३. एकाच वाहनासाठी निविदाधारकांनी सादर केलेले दर जर समान असतील तर त्या निविदाधारकांना विद्यापीठात गठीत समितीसमोर चर्चेसाठी बोलावून जो निविदाधारक सदर वाहनासाठी सर्वाधिक दर देईल त्यास त्या वाहनाची विक्री करण्यात येईल.

४. विद्यापीठाने निर्धारित केलेले किमान मूल्य (विक्री दर) पेक्षा निविदाधारकाने सादर केलेले दर हे कमी असल्यास सदर त्या निविदाधारकांची निविदा रद्द करण्यात येईल.

## विक्री करावयाच्या वाहनांसंबंधी अटी व शर्ती:-

१) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक **हे वाहन जेथे आहे, जसे आहे या तत्वावर विक्रीसाठी** मोहोरबंद निविदा मागवित आहे.

२) निविदा संच **दि. 26.03.2025 ते दि. 23.04.2025** या कालावधीत विद्यापीठाच्या ycmou.ac.in आणि ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवरून डाउनलोड करुन तो भरुन निविदा शूल्क रु. 500/- (विना परतीचे) वेळापत्रकात दिलेल्या Link द्वारे Online जमा करून आलेल्या पावतीची प्रत (Payment Receipt) निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहे.

३) निविदेसोबत प्रत्येक वाहनासाठी अनामत रक्कम रु. 10,000/- (रु.दहा हजार फक्त) वेळापत्रकात दिलेल्या Link द्वारे Online जमा करून आलेल्या पावतीची प्रत(Payment Receipt) निविदेसोबत जोडणे अनिवार्य आहे.

४) पूर्ण भरलेल्या मोहोरबंद निविदा, ह्या कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422222 यांच्या कार्यालयात असलेल्या निविदा पेटीत दि. 11.04.2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जमा कराव्यात. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

५) नाशिक मुख्यालयातील वाहने पाहण्यासाठी **दि. 26.03.2025 ते दि. 23.04.2025** या कालावधीत सुटीचे दिवस वगळून दुपारी 11.00 ते 4.00 वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422222 मुख्यालय येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी सेवा सुविधा कक्षातील **श्री. सुनिल निकम, मो.नं. 9403774789 व श्री. संतोष सोनार मो.नं. 9403774774** यांचेशी संपर्क साधावा.

६) सदर निविदा दि. 24.04.2024 रोजी दुपारी 12.00 वाजता विद्यापीठ वाहन विक्री गठीत समितीसमोर उघडण्यात येतील.

७) विहित मुदतीत प्राप्त न झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. टपालीची दिरंगाई किंवा कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही.

८) अपात्र निविदाधारकांची निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम रु. 10,000/- निविदेची संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर रक्कम परत करण्यात येईल.

९) विद्यापीठाकडून यशस्वी खरेदीदारास आदेश मिळाल्यानंतर 07 दिवसांच्या आत खरेदी किंमत विद्यापीठात जमा करावी लागेल.

१०) उपरोक्त कालावधीत जर संबंधित वाहन यशस्वी खरेदीदाराने ताब्यात घेतले नाही तर खरेदीदाराचा अधिकार राहणार नाही. अशा खरेदीदाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. वाहनांची विल्हेवाट करण्याचा अधिकार विद्यापीठ स्वतःकडे राखून ठेवित आहे.

११) **वाहन खरेदीदाराने वाहन नावावर करण्यासाठी येणारा आर.टी.ओ. व इतर सर्व खर्च खरेदीदाराने स्वतः करावयाचा आहे. खरेदीदाराने खरेदी किंमत जमा केल्यानंतर वाहन स्वतःच्या नावावर केल्यावर नोंदणी प्रमाणपत्राची (RC Book) प्रत विद्यापीठात जमा केल्यानंतर वाहनाचा ताबा संबंधित खरेदीदारास देण्यात येईल.**

१२) वाहन खरेदी केल्यापासून एक महिन्याच्या आत खरेदीदाराने वाहन स्वतःच्या नावावर करुन घ्यावे. तसे रु.100/- च्या स्टँप पेपरवर लेखी हमी वाहन ताब्यात घेतांना द्यावी लागेल.

१३) मुख्यालयातील वाहन नेण्याची जबाबदारी ही खरेदीदाराचीच राहील, त्यासाठी येणारा वाहतुकीचा, हमालीचा व इतर हाताळणीचा खर्च त्याने स्वतः करावयाचा आहे. वाहन कार्यालयीन इमारत/आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन

मालमत्तेचे/ वस्तूंचे नुकसान झाल्यास मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई खरेदीदाराकडून रोखीच्या स्वरुपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.

१४)ज्या नावाने निविदा संच खरेदी केला आहे त्याच नावाने तो भरावा लागेल. नावात तफावत असलेली निविदा विद्यापीठास प्राप्त झाल्यास ती रद्द करण्यात येईल. निविदा संच हस्तांतरित करता येणार नाही.

१५) ज्या नावाने निविदा भरलेली असेल त्याच नावाने वाहन हस्तांतरीत केले जाईल.

१६) सशर्त निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

१७)निविदेची जमा केलेली प्रत्येक वाहनासाठीची अनामत रक्कम रु.10000/- खालीलपैकी कोणत्याही प्रकरणी जप्त केली जाईल.

**अ)** निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा मागे घेतल्यास,

**आ)** निविदा स्विकारल्यानंतर आवश्यक खरेदी किंमत वेळेत न भरल्यास,

**इ)** तसेच खरेदीची रक्कम भरल्यानंतर वाहन ताब्यात घेण्यास नकार दिल्यास, इ.

१८) प्रत्येक वाहनाकरिता व्यक्ती/संस्थेस स्वतंत्र किंवा एकत्रित निविदा सादर करता येईल.

१९) **निविदा सादर करण्याची पध्दती:-** निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी.

**१९.१ लिफाफा क्रमांक - १ (तांत्रिक लिफाफा)**

**अ)** निविदा शूल्क(Tender Form Fee) रु.500/- व अनामत रक्कम (Earnest Money Deposit) रु.10000/- प्रती वाहन या दोन्ही रकमा भरल्याची पावती (Payment Receipt).

**आ)** निविदाधारक स्वतः असल्यास त्याचे पॅन कार्ड, आधार कार्ड ची प्रत

**इ)** निविदाधारक फर्म/संस्था असल्यास संबंधित शासकीय विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र (उदा. शॉप अक्ट किंवा तत्सम रजिस्ट्रेशन),

**ई)** निविदाधारकाच्या वैध जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत (लागू असल्यास).

**१९.२ लिफाफा क्रमांक - 2 (व्यावसायिक लिफाफा)**

निविदाधारकाने सोबतच्या विहीत प्रपत्र (परिशिष्ट-१) यामध्ये विद्यापीठाने निर्धारित केलेले किमान मूल्य (विक्री दर) गृहीत धरून **त्यापेक्षा अधिकचे दर भरून** (अंकी व अक्षरी) स्वाक्षरी करुन लिफाफा क्रमांक २ मध्ये सीलबंद करावा.

**१९.३** निविदाधारकाने वरील दोन्ही लिफाफे (तांत्रिक, व्यावसायिक) एका स्वतंत्र लिफाफ्यामध्ये (मुख्य लिफाफा) सीलबंद करुन वाहनाच्या (वाहन प्रकार व क्रमांक) खरेदीकरीता निविदा असे ठळकपणे नमूद करावे. तसेच सदर मुख्य लिफाफा मा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक 422222. यांना अग्रेषित करावा. मुख्य लिफाफ्यावर निविदा सादर करणाऱ्या व्यक्तीचे/संस्थेचे नाव, पत्ता, ईमेल, व संपर्कासाठी मोबाईल क्रमांक/दुरध्वनी क्रमांक लिहावा.

२०) **निविदा उघडण्याची पध्दतः-**

निविदा उघडतेवेळी प्रथम तांत्रिक निविदा (लिफाफा क्र.१) उघडण्यात येईल. सदर लिफाफ्यामधून विहित केलेल्या कागदपत्रांची पूर्तता केली असल्यासच तो निविदाधारक व्यावसायिक निविदा (लिफाफा क्र.२) उघडण्यास पात्र ठरेल. पात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निविदा उघडण्यात येतील. अपात्र निविदाधारकांच्या व्यावसायिक निविदा उघडल्या जाणार नाही.

२१) कोणतेही दर मंजूर करणे वा रद्द करणे तसेच निविदेची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे विद्यापीठ कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमीमांसा केली जाणार नाही.

२२) **निविदा विक्रीची सूचना, अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in, & http://ycmou.digitaluniversity.ac] संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

**कुलसचिव,**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

***परिशिष्ट -१***

प्रति,
मा. कुलसचिव,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक. 422 222.

मी आपल्या वाहन विक्रीच्या अटी व शर्तीसह खालीलप्रमाणे वाहन खरेदीसाठी निविदा भरीत आहे.

# वाहन विक्री व्यावसायिक निविदा

| **क्र.** | **वाहन क्रमांक** | **वाहनांचा प्रकार** | **वाहनाची किंमत रुपये** | |
|---|---|---|---|---|
| | | | **अंकी (रुपये)** | **अक्षरी** |
| 01 | MH-15 CM 2904 | SPARK | | |
| 02 | MH-15 AK-1344 | BOLERO | | |
| 03 | MH-15 AA-5252 | INNOVA | | |
| 04 | MH-15 AK-1345 | BOLERO | | |

**निविदाधारकाची सही**

**नांवः** (-------------------------------------------------)